

प्रेरणास्थान
श्री. सुरेशदादा जैन

SEED
Suresh Dada Scheme for
Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना



मातोश्री प्रेमाबाई जैन
उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना

# ज्ञानयज्ञ

: आमचे ध्येय :
गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये
शैक्षणिक व उद्योजकिय कौशल्ये विकसित करुन
त्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनविणे.

वर्ष ११ - अंक - २८ - जानेवारी - मे २०२२

**"देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याणे घेत जावे
घेता घेता एक दिवस, देणाऱ्याचे हात घ्यावे"**



एक छोटासा आधार, करी गुणवंताचा उध्द्‌ार !!



# आकाशाला गवसणी घालू या...



**प्रिय विद्यार्थी मित्र मैत्रिणिंनो,**

जीवनात काही क्षण असे येतात की, आपले अंतरंग अनेक भावनांनी भरुन येते. व्यक्त आणि अव्यक्त भावनांचा जणू महासागरच आपल्या अंत:करणात उसळतो. व्यक्त भावना आपण आपल्या शब्द सामर्थ्यावर प्रकट करु शकतो पण अव्यक्त भावना... शब्दांपलीकडील भावनांची अनुभूती केवळ आपण स्वत:च घेऊ शकतो. आजचा क्षणही तसाच आहे. ज्ञानयज्ञच्या माध्यमातून आपणांशी प्रथमत: संवाद साधतांना होणारा आनंद केवळ शब्दांपलीकडचा... अव्यक्त अनुभूतीचा.....

**मित्रांनो,** शैक्षणिक वर्ष २०१९-२० चा शेवट, २०२०-२१ चे अखेरचे वर्ष व २०२१-२२ चा निम्म्याहून अधिक कालावधी कोविड-१९ या वैश्विक महामारीशी संघर्ष करण्यात गेला. या संघर्षात विजय झाला तो मानवतेचा. या संघर्षाच्या कालावधीत एसडी-सीड आपल्या पाठीशी भक्कमपणे उभी होती आणि आपण सारेच जीवनाच्या या संघर्ष यात्रेतून नवीन धडा शिकत मार्गक्रमण करीत पुढील टप्प्यावर येऊन पोहचलो आहोत. आता परिस्थिती सुरळीत झाली असून आपले भविष्य आपल्याच हातात आहे. अर्थात सद्गुरु वामनराव पै यांच्या **"तूच आहे तुझ्या जीवनाचा शिल्पकार"** या उक्तीप्रमाणे तुमच्या यशासाठी तुम्हालाच संघर्ष करावा लागणार आहे. मग तुमच्या संघर्ष-समरात समाजाचे काहीच देण लागत नाही का? असं नाही आहे, आपणाला सर्वोतोपरी सर्वंकष-सर्वसमावेशक मार्गदर्शन, सहयोग, मदत करण्याची जबाबदारी समाजातील प्रत्येक घटकांवर आहे. आणि याच सामाजिक बांधीलकीच्या जाणीवेतून एसडी-सीड ने एक नवीन संकल्पना राबविण्यास सुरुवात केली आहे.

विद्यार्थ्यांना केवळ आर्थिक मदत, अभ्यासक्रम निवड मार्गदर्शन इत्यादी योजनांवर न थांबता काही विद्यार्थी-विद्यार्थीनींना आवश्यकतेनुसार जीवनात प्रत्येक क्षेत्रात मार्गदर्शन करण्यासाठी मेन्टोरशिप प्रोग्राम सुरु केला. या योजनेअंतर्गत एका मार्गदर्शकावर पाच ते सात विद्यार्थ्यांची जबाबदारी देऊन त्यांना सर्वंकष मार्गदर्शन करतांना भावनिक समर्थन देण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. या योजने अंतर्गत काही विद्यार्थी त्यांच्या वैयक्तिक समस्यांवरही मार्गदर्शन प्राप्त करीत यशाकडे वाटचाल करीत आहेत.

**विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो,** आपणापैकी प्रत्येकाला वाटते की, जीवनात मोठे यश प्राप्त करीत आकाशात उंच भरारी घ्यावी. पण मोठा प्रश्न आहे हे यश कसे प्राप्त करावे त्यासाठी कोणकोणत्या क्षेत्रात काय करावे लागेल यासाठी कठोर परीश्रम अर्थात अभ्यासाव्यतिरिक्त तुमचे व्यक्तिमत्वही संस्कारीत करावे लागेल. आकाशाला गवसणी घालणारे यश प्राप्त करण्यासाठी, क्षितीजालाही कवेत घेणाऱ्या आकाश सारखे व्यक्तिमत्व विकसित, संस्कारीत करावे लागेल. अर्थात तुमच्या व्यक्तिमत्वात **"आकाश - AKASH"** चा अंतर्भाव करावा लागेल..




**Attitude - दृष्टीकोन :** हावर्ड विद्यापिठाद्वारे करण्यात आलेल्या एका सर्वेक्षणात असं आढळून आलं आहे की, जेव्हा एखादा व्यक्ती यशस्वी होतो तेव्हा त्याच्या यशात ८५ टक्के हिस्सा त्याच्या Attitude चा असतो, तर केवळ १५ टक्के हिस्सा त्याच्या तांत्रिक ज्ञानाचा असतो.

**Knowledge - ज्ञान :** ज्ञानप्राप्ती केवळ योग्य शिक्षणाद्वारेच शक्य आहे. अर्थात शिक्षण म्हणजे केवळ पदवी नव्हे... तर शिक्षणाची खरी परिभाषा आहे.... नूतन संभावनांच्या साम्राज्याची निर्मिती करुन त्या संभावनांना मूर्त स्वरुप देण्याचे कौशल्य व बळ प्राप्त करणे म्हणजे शिक्षण होय.

**Affiliation - संलग्नता:** मानवतेच्या, राष्ट्राच्या व समाजाच्या हितासाठी मी कटिबद्ध आहे ही भावना अंत:र्मनात तेवत ठेवली पाहिजे.

**Skills - कौशल्य:** व्यावसायिक, तांत्रिक, संभाषण आदी विविध कौशल्ये आत्मसात केल्याशिवाय व्यक्तिमत्व परिपूर्ण होऊच शकत नाही. यासाठी महाविद्यालयातील प्रात्यक्षिके बारकाईने अभ्यासण्याची सवय अंगीभूत करणे अत्यंत आवश्यक आहे.

**Humanity - मानवता:** मानवीय भावनेशिवाय सर्वकाही व्यर्थ आहे. मानवता वजा करता आपले व्यक्तिमत्व म्हणजे मोठे शून्य आहे. मित्रांनो आपले ३ H अर्थात **Hand, Head, Heart** सदैव तत्पर असावे. सद्विचारांना सामावून घेण्यासाठी अन कुविचारांना बाहेरचा रस्ता दाखविण्यासाठी डोके सदैव खुले असावे तर शत्रुलाही आपल्या ह्रदयात स्थान देण्यासाठी ह्रदयाचे दार सदैव खुले असावे.

सगळयात शेवटी मी एकच सांगेन **"आपल्या जीवनाच्या भव्य इमारतीचा पाया चरित्र, ज्ञान, सकारात्मक दृष्टीकोन अन मानवता या चतु:सुत्रीवर उभारा त्यामुळे जीवनाच्या भव्य इमारतीवर यशाचे कितीही मजले चढले तरी इमारतीचा पाया ढासळणार नाही"**

प्रा. संजय दहाड
सल्लागार समिति सदस्य, एसडी-सीड

| या अंकात.... | पृष्ठ |
|---|---|
| १. संपादकीय | २ |
| २. प्रवेशासाठी ही कागदपत्रे तयार ठेवा... | ३ |
| ३. विद्यार्थ्यांसाठी एसडी-सीड | ४ |
| ४. करिअर निवडतांना ओळखा स्वत:ला... | ५ |
| ५. नेतृत्व कौशल्य | ६ |
| ६. आत्मविश्वासाने न्युनगंडावर मात करा... | ७ |
| ७. लाभार्थ्यांचे मनोगत | ८ |

**ज्ञानयज्ञ संपादक मंडळ**

**श्री. राजेश यावलकर - ज्ञानयज्ञ प्रमुख संपादक, श्री. एन. जे. गादिया, श्री. महेश गोरडे**
**श्री. निलकंठराव गायकवाड, प्रा. एस. व्ही. सोमवंशी, श्री. रवि टाले**

# विद्यार्थ्यांनो ! प्रवेशासाठी ही कागदपत्रे ठेवा तयार.....



राज्य शिक्षण मंडळाच्या दहावी, बारावीचा निकाल लवकरच लागण्याची शक्यता आहे. त्यानंतर तंत्रशिक्षणाच्या पदविका, पदवी, पदव्युत्तर प्रवेशाची प्रक्रिया सुरु होतील. प्रत्यक्ष प्रवेशावेळी मूळ कागदपत्रे असणे आवश्यक आहे. अन्यथा आरक्षणाचा सर्व लाभ घेता येणार नाही. त्यासाठी आतापासूनच प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे तयार ठेवा.

## ॲमिशनसाठी आवश्यक कागदपत्रांची यादी....

- जात प्रमाणपत्र
- जात वैधता प्रमाणपत्र
- नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्र
- डोमिसाईल प्रमाणपत्र
- उत्पन्नाचे प्रमाणपत्र
- आर्थिक दुर्बल घटक प्रमाणपत्र
- अपंगत्वाबाबतचे प्रमाणपत्र
- सैन्य दलातील प्रवर्ग प्रमाणपत्र
- अल्पसंख्यांक प्रवर्ग प्रमाणपत्र
- आधार क्रमांक
- बँक खाते

## तर नाही मिळणार लाभ.....

प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना जात प्रमाणपत्र अथवा जात वैधता प्रमाणपत्र योग्य वेळेत न मिळाल्यास खुल्या संवर्गातून प्रवेश निश्चिती केली जाते. त्यामुळे आरक्षणाचे कोणतेही लाभ घेता येत नाही.

## आता पासून करा तयारी.......

प्रवेशासाठी अर्ज करतांना सुविधा केंद्रावर कागदपत्रे पडताळणीच्या वेळी प्रवेश नियमावलीत नमूद केलेल्या आवश्यक ती कागदपत्रे सक्षम अधिकाऱ्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहेत. त्यासाठी कागदपत्रे प्राप्त करण्यासाठी आतापासून सुरुवात करावी.



## *प्रवेशासाठी केंद्रिय प्रवेश प्रक्रिया*

प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष, पोस्ट एसएससी पदविका, प्रथम वर्ष पोस्ट एचएससी औषधनिर्माण शास्त्र, एचएमसीटी, सरफेस कोटिंग टेक्नोलॉजी पदविका अभ्यासक्रम, तसेच प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी / तंत्रज्ञान, औषधनिर्माण शास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरिंग टेक्नोलॉजी पदवी, प्रथम वर्ष वास्तुशास्त्र, बी प्लानिंग पदवी, प्रथम वर्ष एमई / एम. टेक, एम फार्म, फार्म डी, एम आर्किटेक्ट, एम. प्लानिंग, एमएचएमसीटी, एमबीए / एमएमएस, एससीए हे पदव्युत्तर पदवी या अभ्यासक्रमाचे प्रवेश केंद्रिय प्रवेश प्रक्रियेद्वारे राबविले जातात.

# *एसडी-सीडचा अभिमानास्पद क्षण*

## *डॉ. व्हि. एल. माहेश्वरी (सल्लागार समिती सदस्य) यांची कुलगुरु पदी निवड*



डॉ. व्हि. एल. माहेश्वरी
सल्लागार समिती सदस्य
एसडी-सीड, जळगाव

एसडी-सीड, उगवत्या पिढयांना त्यांच्या स्वप्नांना स्पर्श करता यावा म्हणून पाठीवरती हात ठेवत धावण्यासाठी बळ देणारी चळवळ... या चळवळीत स्वत:ला वाहून घेणारे आपण... कायमच आपल्या कल्पकतेने आणि सृजनतेने वेगळेपण जपत आलात..! होतकरुंच्या शिक्षणासाठी सुरु असलेल्या या चळवळीत आपल्या सारख्यांच्या सोबत असण्यांन बळ येतं, ऊर्जा येते... आणि आपल्या या चळवळीतील दोन हात आता विद्यापिठाची धुरा सांभाळत शिक्षणाचं आभाळ अधिक विस्तीर्ण करण्यासाठी सक्षमपणे, सजगपणे कृतीशील झाले आहेत हे आम्हां सर्वांसाठी जास्त आनंददायी आणि अभिमानास्पद आहे. मनात संकल्प, डोळयात ध्येय, विचारात स्पष्टता आणि वागण्यात संवेदशीलता असणारी माणसं या अस्वस्थ काळात नव्या पिढीशी हितगुज साधायला हवी आहेत, अशा काळात आपल्या नेतृत्वात अनेक तरुण उद्याच्या भविष्याची योजना आखत बाहेर पडतील, येणाऱ्या काळात आदर्श तरुणांची रसद पुरवण्याची प्रचंड जबाबदारी आपल्या खांद्यावर असली तरी आपण सक्षम आहात हा विश्वास आमच्या ठायी आहे. पुढील वाटचालीसाठी मंगलमय अनंत शुभेच्छा ....!

# एसडी-सीड करिअर कौन्सेलिंग उपक्रमाची यशस्वी सुरुवात...

## करिअरचा शोध बाह्य जगतात घेण्यापेक्षा स्वत:च्या आत घ्या...

विद्यार्थ्यांमधील सुप्त कौशल्यांची त्यांना स्वत:ला ओळख व्हावी आणि त्यांचा आत्मबोध होऊन त्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे अत्यंत महत्वाचे आहे.

त्यासाठी एसडी-सीडतर्फे इयत्ता नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक करुन अचूक करिअर निवडीसाठी प्रोत्साहन देणे या उद्देशाने करिअर कौन्सेलिंग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यात एकूण ३०५ विद्यार्थ्यांनी मार्गदर्शनाचा लाभ घेतला.




त्यासोबतच मागील पाच महिन्यात एसडी-सीडने विद्यार्थ्यांमधील सुप्त कौशल्यांचा विकास होण्यासाठी एकूण १० कार्यक्रम राबविले. त्यात ७५१ विद्यार्थ्यांनी वेगवेगळया प्रशिक्षणाचा लाभ घेतला.



स्मार्ट गर्ल
१ कार्यशाळा




मुलाखत कौशल्य
१ कार्यशाळ




एम.एस. ऑफिस ॲप्लिकेशन
१ कार्यशाळ




श्रवण कौशल्य विकास
१ कार्यशाळा




स्वयंशिस्त विकास
१ कार्यशाळा




स्मृती विकास आणि एकाग्रता
१ कार्यशाळा




ध्येय निश्चिती आणि संपादन करणे
२ कार्यशाळा




वेळेचे नियोजन
१ कार्यशाळा



परिक्षेला सामोरे जातांना..
१ कार्यशाळा



# करिअर निवडतांना ओळखा स्वत:ला ..

**कोणते शिक्षण घ्यावे आणि कोणत्या क्षेत्रात व्यवसाय, नोकरी, प्रोफेशन करावा म्हणजेच कोणत्या विषयात शिक्षण घ्यावे आणि कारकिर्द करावी ? हा आजचे मुलं, तरुण आणि पालकांपुढील महत्वाचा प्रश्न आहे.** आई-वडील एक सुचवतात, मित्र वेगळाच मार्ग निवडतात, शिक्षकांना विचारलं तर त्यांनी दर्शविलेला मार्ग वेगळाच असतो, नातेवाईक, हितचिंतक आणखीन वेगळाच रस्ता दाखवतात. जाहिराती, सोशल मिडिया, गॉसिप्स यांचा परिणाम आपल्यावर होतो. यासर्व मतांचा आपल्यावर प्रभाव असतो आणि आपला गोंधळ उडतो.

ज्या क्षेत्रात करिअर करावयाचे त्याच क्षेत्रात शिक्षण घेणे केव्हाही उचित असतं. पण कारकिर्द कोणत्या क्षेत्रात करायची आहे हे बरचं आधी कसं ठरवायच? हा मोठा प्रश्न असतो. सध्या मागणी कोणत्या क्षेत्राला आहे? किंवा जेव्हा आपण पाच किंवा सात वर्षांनी आपलं शिक्षण पूर्ण करु तेव्हा कोणत्या क्षेत्राला मागणी असेल? आपला चरितार्थ व्यवस्थित चालवता येईल, आपली स्वप्न पूर्ण होतील एवढे उत्पन्न आपण मिळवू शकू का? आपले आई-वडीलांचे प्रयत्न सार्थकी लागतील का? असे एक ना दोन, अनेक प्रश्न आजच्या विद्यार्थ्यांसमोर आहेत.

माझ्या मते आपल्या शिक्षण विषयाचा आणि करिअरचा शोध बाह्य जगात घेण्यापेक्षा आपल्या आत, आपल्या अंत:रंगात घेण्याची गरज आहे. स्वत:ला समजून घेणे, स्वत:ला जाणणे, आत्म-अध्ययन खरे मार्गदर्शन करु शकेल. मी नक्की कसा आहे? माझी खरी आवड काय आहे? जशा, भारतरत्न लता मंगेशकर आपल्या गाण्याने अजरामर झाल्यात, जसा सचिन तेंडुलकर क्रिकेटमुळे अजरामर झाला. एक ना दोन अशी हजारो उदाहरणे आपल्या पुढे आहेत. प्रत्येक व्यक्तिची स्वत:ची मूळ प्रवृत्ती, आवड, स्वत:चा मूळ भाव, स्वभाव, अंत:प्रेरणा ती ओळखली की शिक्षणाचा विषय आणि करिअरची दिशा अचूकपणे ठरवता येते.

प्रत्येक जण परिपूर्ण आहे. प्रत्येक व्यक्तिसाठी कोणत्या क्षेत्रात हे पूर्णत्व उपस्थित आहे ते क्षेत्र शोधणे हा प्रत्येक व्यक्तिसाठी आत्मबोध आहे. आज पालकांच्या इच्छेनुसार, परिस्थितीच्या रेट्यामुळे, शिक्षणाचं, कामाचं क्षेत्र निवडलं जातं आणि नंतर आयुष्यभर असामान्य माणूस सामान्य जीवन तडजोडी करत जगत राहतो. ही आजची विदारक स्थिती आहे.

**आपली मूळ प्रकृती कोणती हे शोधणं म्हणजे आत्मबोध.** जे आपण घेवून आलो आहोत त्याचा शोध न घेता, जे आपण घेवून आलो नाही त्याच्या मागे लागल्यामुळे, कधीच पूर्ण होऊ न शकणाऱ्या इच्छांच्या मागे आपण धावत असल्यामुळे आणि समाजही अशाच इतर गोष्टींकडे प्रवृत्त करत असल्यामुळे आपल्या समोर समस्या आहेत आणि जीवनात दु:ख आहे. ज्यांना आपल्यात दडलेलं आवडीचं क्षेत्र सापडलं नाही त्यांनाच विकल्प, पर्याय, अनिर्णायकता आणि दु:ख असतात. ज्यांना हा आत्मबोधाचा खजिना गवसतो ते निर्विकल्प, एकाग्र, अद्वितीय होतात.

आपला छंद जर आपला अभ्यास विषय आणि व्यवसाय झाला तर यापेक्षा आधिक चांगली कोणतीच गोष्ट नाही असे म्हटले जाते. प्रत्येक व्यक्ती अद्वितीय आहे. प्रत्येकाची गती वेगवेगळया क्षेत्रात असते. आपले सामर्थ्य क्षेत्र बालपणीच समजले तर उर्वरीत आयुष्यात त्याक्षेत्रात आपण प्रचंड प्रगती करु शकतो. त्यामुळे आज सार्वत्रिक असणारा भरकटलेपणा, निराशा, उद्वेग कमी होईल. म्हणूनच म्हणतात, **Search Inward, reach outward.** बाहेर कशाला स्कोप आहे, बाहेर कशाला मागणी आहे हे शोधा पण आत कोणती उर्मी आहे? आतून आग कशाची आहे? आपलं मन कशात रमणार आहे? हे शोधणं अधिक महत्वाचे आहे. ते सापडलं की ताण नाही की तणाव नाही, फक्त आणि फक्त आनंद ! हा सततचा निखळ आनंद सर्व वाचकांना मिळो ही सदिच्छा.....

**डॉ.विवेक वसंतराव काटदरे**
**सल्लागार समिती सदस्य,**
**एसडी-सीड, जळगाव**



# नेतृत्व कौशल्य



**नेतृत्व म्हणजे काय?**

ध्येय व उद्दिष्टये प्राप्त करण्याच्या हेतूने लोकांच्या किंवा एखाद्या संस्थेच्या गटाला मार्गदर्शन करण्याची क्षमता म्हणजे नेतृत्व होय. इतरांना उत्साही पध्दतीने प्रेरित करुन उद्देश साध्य करण्यास प्रवृत्त करण्याची क्षमता म्हणजे नेतृत्व. नेतृत्व हे एका गटाला एकत्रित बांधून ध्येयाकडे वळविण्याची एक मानवी प्रक्रिया आहे. नेतृत्व हे लोकांना मार्गदर्शन करुन, त्यांना प्रेरणा देऊन, त्यांच्या आत्मविश्वास वाढविण्यास आणि कार्य करण्यासाठी उत्साही नेतृत्व पुरविते. समूहामध्ये नेतृत्व म्हणजे संघ भावना वाढवून उत्कृष्टतेने ध्येय साध्य करण्यास प्रवृत्त करणे.

**चांगल्या नेतृत्वाचे महत्व:**

- ❖ एक गट किंवा संघटना त्यांची ध्येय आणि उद्दिष्टे यशस्वीपणे साध्य करण्यात एक महत्वाची भूमिका बजावते.
- ❖ त्यामुळे लोक स्वेच्छेने, प्रभावीपणे आणि कार्यक्षमतेने कार्य करतात.
- ❖ नेतृत्वामुळे गटातील सदस्यांना प्रभावीपणे ध्येय, दृष्टी आणि धोरणांशी संवाद साधण्यास मदत होते.
- ❖ नेतृत्व हे प्रत्येकास वैयक्तिक कार्य आणि जबाबदाऱ्यांबद्दल कल्पना स्पष्ट होण्यास मदत करते.
- ❖ नेतृत्व हे गटामध्ये एकत्रीकरणाची आणि संघ भावना निर्माण करण्यास मदत करते.
- ❖ यामुळे प्रत्येकास आपले सर्वोत्तम कार्य करण्यास प्रेरणा मिळते.
- ❖ चांगल्या नेतृत्वामुळे स्वप्ने आणि ध्येये प्रत्यक्षात आणण्यास मदत होते.

**प्रभावी नेतृत्व कौशल्यासाठी आवश्यक घटक:**

❖ **आत्मविश्वास:** आत्मविश्वासाशिवाय प्रभावी नेतृत्व करणे शक्य नाही. केवळ एक आत्मविश्वासपूर्ण नेता लोकांना स्वच्छेने त्याचे अनुकरण करण्यास प्रवृत्त करु शकतो.

❖ **पारदर्शकता:** चांगला नेता त्याच्या सर्व कार्यामध्ये पारदर्शकता आणतो. प्रभावी संभाषण, योग्य निर्णय घेणे, निरोगी वादविवाद आणि सर्वसामावेशकते पर्यंत पोहचवणे यामुळे घडू शकते.

❖ **संप्रेषण कौशल्य:** प्रभावी नेतृत्वाकडे चांगले संवाद कौशल्ये असतात आणि सदस्यांना समूहाच्या ध्येयांचा सक्षम पाठपुरावा करण्यास प्रेरित करतात. ते त्यांच्या समूह सदस्यांना सहजपणे कनेक्ट करु शकतात.

❖ **चांगला निर्णय घेणे:** निर्णय घेण्याआधी चांगले नेते नेहमीच चांगले व वाईट गोष्टींचे परिक्षण करतात. परंतु एकदा निर्णय घेण्यात आला की ते पुन्हा त्यावर चर्चा करीत नाहीत. नेता घेतलेल्या निर्णयासह वचनबध्द आणि ठाम राहतो.

❖ **प्रामाणिकपणा आणि सचोटी:** प्रभावी नेतृत्वगुणाचे मुळ प्रामाणिकपणा आहे. नेता स्वत:च्या चुकांकरीता स्वत:ला जबाबदार धरतात आणि दुसऱ्यांना दोष देत नाहीत. त्यांची अपयशांपासून नेहमीच शिकण्याची इच्छा असते. निराश होण्याऐवजी, त्या कारणांचा शोध घेऊन विश्लेषण करतात आणि ती कारणे कमी करण्याचा प्रयत्न करतात.

❖ **स्व-जाणिव:** प्रभावी नेता त्याच्या बलस्थाने आणि कमजोरपणाबद्दल नेहमीच जागरुक असतो. तो आपली कौशल्ये बुद्धीकौशल्याने वापरतो आणि त्याच्या कमकुवतपणावर कार्य करतो. त्याच्या कमकुवतपणावर मात करण्यासाठी मदतीची मागणी करण्यापासून तो कधीही लाजत नाही.

❖ **संघ बांधणी:** एक प्रभावी नेता एक संघ निर्माता असतो. त्याच्या समूहातील सदस्यांमध्ये वेगवेगळया प्रकारच्या व्यक्तिमत्व आणि शैली असल्यास समूह सर्वोत्तम कार्य करतो याची जाणिक असते. त्यामुळे या गटाचे परिप्रेक्ष वाढविण्यास मदत होते.

❖ **दृष्टीक्षेप:** दृष्टीक्षेपाशिवाय नेता प्रभावी होऊ शकत नाही. नेता केवळ विशाल दृष्टीकोनातून कार्यरत असावा, त्याने त्याच्या कामासाठी सर्जनशील, नाविण्यपूर्ण, भावनिक असले पाहिजे आणि बंदिस्त चौकटीच्या पलीकडे जाऊन विचार करण्यास सक्षम असावा.

### प्रभावी नेतृत्वासाठी टिप्स:

- ✍ **वास्तववादी बना.**
- ✍ **आपले सामर्थ्य समजून घ्या आणि त्याचा वापर करा.**
- ✍ **आपल्या कमतरता शोधा आणि त्यावर कार्य करा.**
- ✍ **स्वत:च्या आधी समूहाला महत्व द्या.**
- ✍ **आपण जे काही करता ते पारदर्शी असू द्या.**
- ✍ **परिपूर्णतेवर भर द्या.**
- ✍ **यश साजरे करा.**
- ✍ **अपयशाच्या कारणांचा शोध घ्या.**
- ✍ **आपण सुरु केलेले कार्य वेळेत संपवा.**

**श्री. नंदलाल गादीया**
**गव्हर्निंग बोर्ड सदस्य,**
**एसडी-सीड, जळगाव**





# आत्मविश्वासाने न्युनगंडावर मात करा...

**मित्रांनो,** अनेकदा लोकांच्या मनात आपण निरुपयोगी आहोत किंवा नालायक आहोत, आयुष्यात आपण फारसं काही मोठं केलेलं नाही अशी भावना निर्माण होते. जाणून घ्या या भावनेपासून सुटका कशी मिळवायची आणि आपल्या मनाचं आरोग्य कसं जपाव.

आयुष्यात एका वयात स्वतःला नालयक समजणे किंवा आपला काही फारसा उपयोग नाही ही भावना कधी ना कधी लोकांच्या मनात येते. अशा स्थितीत व्यक्तिसमोर दोन मार्ग असतात. एक तर तो समस्येला खंबीरपणे सामोरे जाऊ शकतो किंवा तो या समस्येसमोर हार मानू शकतो आणि स्वतःलाच निराश करु शकतो.

मात्र, काही सोप्या आणि अनमोल पद्धतींचा अवलंब करुन ह्या अशा व्यर्थ भावनेपासून तुम्ही मोकळे होऊ शकता. ही आम्हाला नक्की खात्री आहे. आजचा लेख त्याच पद्धतीवर आहे. आज या लेखाद्वारे आपण निरुपयोगी असल्याच्या भावनेतून कसं बाहेर पडावं हे बघणार आहोत.

### १. स्वतःशी बोला

स्वतःशी बोलणे म्हणजे स्वतःला समजून घेणे. सर्व माणसाला त्याचा स्वभाव, वागणूक, त्याच्या भावना आणि त्याच्या आवडी-निवडी याबद्दल माहिती असणे आवश्यक आहे आणि त्याला हे देखील माहित असले पाहिजे की त्याच्या आत नकारात्मक विचारांचे कारण काय आहे. स्वतःची ओळख नसेल तर आपण स्वतःच्या आत नवीन गोष्टी शोधू शकत नाही आणि स्वतःबद्दल आतून न्यूनगंड बाळगतो.

### २. झालं ते झालं पण तुमचा उद्याचा दिवस उज्ज्वल करा.

जेव्हा मनात अशा भावना येतात तेव्हा एखादी व्यक्ती आपल्या पुढच्या कोऱ्या सुंदर भविष्याबद्दल विचार करत नाही आणि त्या झालेल्या क्षणांचा विचार करते ज्यामध्ये त्याने सर्वात वाईट कामगिरी केली आहे. अशा परिस्थितीत व्यक्तीला या विचारसरणीतून बाहेर काढण्यासाठी भविष्यातील सुंदर योजना उपयुक्त ठरु शकतात. अशा वेळी माणसाने अशा काही योजना बनवायला हव्यात, ज्याचा आनंद तर मिळतोच पण त्याचा आपल्या भविष्यावरही सकारात्मक परिणाम होतो. उद्याचा दिवस तुमचाच असेल.

### ३. लोकांची मदत घ्या.

जर तुम्हाला वाटत असेल की, तुम्ही कुठल्याच कामात चांगले नाही तर अशा परिस्थितीमध्ये तुमच्या आजूबाजूच्या मित्रांची किंवा कुटुंबातील सदस्यांची मदत घ्या आणि त्यांच्याकडून तुमच्यामध्ये कोणते गुण आहेत आणि कोणते दोष आहेत हे जाणून घ्या. अशा परिस्थितीत, आपल्या सामर्थ्यावर काम करा आणि आपल्या दोषांवर मात करण्याचा प्रयत्न करा.

### ४. इतरांशी तुलना करु नका.

काही लोकांना स्वतःची इतरांशी तुलना करण्याची सवय असते आणि यामुळेही नालायकपणाची भावना निर्माण होते. अशा परिस्थितीत स्वतःची तुलना करणे थांबवा आणि असा विचार करा की प्रत्येक व्यक्ती स्वतःमध्ये भिन्न आहे आणि त्याच्या इच्छा देखील एकमेकांपासून वेगळ्या आहेत. तुलना करण्याऐवजी तुमचं लक्ष उद्दिष्टांवर केंद्रित करा आणि तुमचं ध्येय तयार करा.

### ५. प्रेरणादायी गोष्टी उपयोगी पडतील

आपल्या देशात असे अनेक महापुरुष झाले आहेत, ज्यांनी देशासाठी आपल्या प्राणांची आहुती देऊन देशाच्या वैभवासाठी आपल्या इच्छांचा त्यागही केला आहे. अशा महापुरुषांच्या कथा वाचा, ह्या मोटिवेशनल गोष्टी ऐकल्याने तुमचा आत्मविश्वास तर वाढेलच पण तुमच्यात निर्माण होणारा न्यूनगंडही दूर होण्यास मदत होईल. स्वतःसाठी नाही तर इतरांसाठी कसं जगावं हे तुम्हाला समजेल.

तर मित्रांनो स्वतःबद्दल नकारात्मक विचार करणे किंवा स्वतःला कमी लेखणे चुकीचे आहे. यामुळे व्यक्तीचा आत्मविश्वास तर कमकुवत होतोच पण त्याचा त्याच्या व्यक्तिमत्वावरही विपरीत परिणाम होतो. अशा परिस्थितीत माणसाने काही चांगले विचार आणि कृती करुन त्यातील जगण्याची ऊर्जा अनुभवून अशा भावनेपासून आत्ताच दूर राहणे आवश्यक आहे.

**प्रा. एस. व्ही. सोमवंशी**
**सल्लागार समिती सदस्य**
**एसडी-सीड, जळगाव**



# आमची उद्दिष्टे



- सर्व पात्र विद्यार्थ्यांना २१व्या शतकातील भारताच्या विकासात सहभागी होण्याची संधी प्राप्त करुन देणे.
- विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये शिक्षणाचे महत्व आणि परिणामाबद्दल प्रबोधन करणे.
- सर्व पात्र विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक व उद्योजकिय ध्येय गाठण्यासाठी आर्थिक मदत करणे.
- विद्यार्थी, पालक व शिक्षकांना सक्षम बनविण्यासाठी नवनवीन उपक्रम विकसित करुन ते अंमलात आणणे.
- सर्व उपक्रमांना स्वयंपूर्ण बनवणे, ज्यायोगे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळेल.

# लाभार्थ्यांचे एसडी-सीडबद्दलचे मत ....



**आशा रविंद्र महाजन - एरंडोल - बी.ए. (प्रथमवर्ष)**

जेव्हा आपल्यावर संकटे येतात आणि जो काही आपला संघर्ष सुरु असतो तेव्हा देव ती संकटे निवारण्यासाठी कोणाला तरी आपली मदत करायला पाठवित असतो. त्याचेच एक जिवंत उदाहरण म्हणजे मा. सुरेशदादा जैन. मी लहान असतांनाच आई-वडीलांचे छत्र हरविले. आजोबांकडे खेडेगावात दहावी पर्यंतचे शिक्षण स्वत: शेतात काम करुन जेमतेम घेतले. उच्चशिक्षण घेण्याची आवड पण परिस्थिती साथ देत नव्हती. अशातच एसडी-सीडची शिष्यवृत्ती मिळाली व शिक्षणाचा मार्ग सुकर झाला. आता कोणतीही आर्थिक अडचण नसून अभ्यास करण्यासाठी प्रेरणा मिळत आहे. मा. दादांच्या रुपाने वडीलांचे छत्र मला मिळाले असून ईश्वर दादांना दिर्घायुष्य देवो ही प्रार्थना करते.



**प्रद्युम्न रविंद्र किटुकले - जळगाव - बी. ई. कॉम्पुटर (द्वितीय वर्ष)**

मला सांगतांना अतिशय आनंद होत आहे की, मी मागील चार वर्षांपासून अखंडपणे एसडी-सीड शिष्यवृत्तीचा लाभ घेत आहे. माझी घरची परिस्थिती फारच हालाकीची असून वडील बांधकाम मजूर आहेत. परिस्थिती जेमतेम असतांना मी पाहिलेले इंजिनिअर होण्याचे स्वप्न पुर्ण होईल की नाही याची मनात शंका होती. एसडी-सीडच्या मदतीमुळे मी नक्कीच एक चांगला इंजिनिअर होईल असा आत्मविश्वास मिळाला असून मी पाहिलेले स्वप्न पूर्ण होण्याच्या मार्गावर असून हे सर्व शक्य झाले ते मा. सुरेशदादा जैन यांच्या सकल्पनेतून साकार झालेच्या एसडी-सीड मुळेच. मा. सुरेशदादांनी सुरु केलेले हे कार्य खुपच महान आहे ज्याची इतर कोणत्याही कार्याशी तुलना होऊ शकत नाही. दादांनी माझ्या सारख्या हजारो मुलांना दिलेली साथ अशीच राहो अशी माझी इच्छा असून दादांना उदंड आयुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना करतो.



**राजश्री संजय तायडे - जळगाव - एम. कॉम. (प्रथम वर्ष)**

माझी घरची परिस्थिती सामान्य आहे. मी लहान असतांना वडीलांचे निधन झाले आहे. आई मिळेल ते काम करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. त्यातच माझे पदव्युत्तर शिक्षण सुरु असल्याने खर्चही फार होता. अशा परिस्थितीत एसडी-सीडची शिष्यवृत्ती मला मिळाली आणि माझ्या उच्चशिक्षणात खुप मोठा आर्थिक आधार मला मिळाला आहे. यामुळे सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना त्यांच्या ध्येयाच्या दिशेने जाण्यास प्रेरणा मिळत आहे. दादांना माझी एकच विनंती आहे की, ही शिक्षणाची ज्योत अशीच अखंड तेवत राहून त्यांनी हा उपक्रम असाच चालू ठेवावा. दादा, तुम्ही असेच सदैव आमच्या विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहो आणि हे सत्कर्म असेच निरंतर चालू राहो हिच ईश्वरचरणी प्रार्थना करते.



**भावेश वासुदेव अहिरे - पाचोरा - एस.वाय.जे.सी. (बारावी) विज्ञान**

माझ्या वडीलांचे लहानसे सलूनचे दुकान असून आर्थिक परिस्थिती साधारण आहे. मी दहावी उत्तीर्ण झाल्यावर मला डिफेन्समध्ये करिअर करायचे असल्याने त्यासाठी मी औरंगाबाद येथे प्रवेश घेतला. त्यासाठी खर्चही अधिक लागणार होता अशा संकटसमयी एसडी-सीडची शिष्यवृत्ती मला गेल्या दोन वर्षांपासून मिळत आहे. यामुळे कॉलेजची फी भरणे शक्य झाले. एसडी-सीडमुळेच मला नवी दिशा मिळाली असून माझ्या स्वप्नांना भरारी घ्यायला बळ मिळाले आहे. आर्थिक परिस्थिती साधारण असली तरी आपण या स्पर्धात्मक जगात टिकून राहू शकतो असा आत्मविश्वास निर्माण झाला आहे. माझ्या जीवनाला नविन दिशा दिल्याबद्दल एसडी-सीड आणि आ. सुरेशदादा जैन यांचे मनापासून आभार मानतो.

SEED
Suresh Dada Scheme for
Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना

**HEAD OFFICE :**
7, Shivaji Nagar, Jalgaon - 425001, Maharashtra, India.
Tel: (0257) 2235254 I Fax: (0257) 2234258 I Website: www.sdseed.in